**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक - २०७/२०२२**
**महा. शासन वि. मसुजी शामराव पाटील**
**निशाणी क्रमांक- १२/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - १ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | मारुती कृष्णा देसाई |
| वय | - | ४२ वर्षे |
| व्यवसाय | - | हॉटेल व्यवसाय |
| पत्ता | - | सोळांकूर, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** मी दि.२७/०७/२०२२ रोजी कोठेही गेलेलो नाही. पोलीसांनी माझी तयार पंचनामेवर सही घेतली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर माहितीचा नाही. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. सहीस **नि.P13/PW1** देण्यात येते.

**साक्षीदाराने अभीयोग पक्षास सहकार्य न केलेने विशेष सरकारी अभीयोक्ता एस. बी. कांबळे यांनी साक्षीदारास उलटतपासणीत विचारले जाणारे सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७/०७/२०२२ रोजी मी पोलीसांसोबत सोळांकूर गावी प्राची टायर दुकानासमोर पंचनामे करीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरील ठिकाणी आरोपी देशी दारु संत्रा कंपनीच्या १८० मीलीच्या १८ बाटल्या विकत असल्याचे मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझे समक्ष सदरील

बाटल्या जप्त करुन पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझेच समक्ष झालेला असून आरोपी माझे गावचा असलेने त्याला वाचविण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. यु. एम. मानकर यांचे मार्फत नाकारण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

दिनांक : २८/०४/२०२६

सही/-

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २), राधानगरी